अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
१५.०७.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १६५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### सराफा बाजारात सोन्याच्या दरात घसरण : चांदीचे दर स्थिर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – देशांतर्गत सराफा बाजारात आज सुरुवातीच्या व्यवहारात सोन्याच्या दरात किंचित घसरण दिसून येत आहे. चेन्नई वगळता देशभरातील बहुतेक सराफा बाजारांमध्ये सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम १०० ते ११० रुपयांची घसरण झाली.

## ‘होर्मुझ सुरक्षित पार केलं’... काही मिनिटांतच झाला हल्ला : भारतीय इंजिनिअरचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***पुणे*** – होर्मुझ सामुद्रधुनी येथे मालवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्यात भारतीय खलाशी हेरंब करमरकर यांचा मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी झाली आहे. रविवारी पहाटे जहाजावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर ते बेपत्ता झाले होते. मंगळवारी त्यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या मृत्यूची माहिती दिली.



पुण्याचे हेरंब करमरकर हे एमव्ही जीएफएस गॅलेक्सी या मालवाहू जहाजावर थर्ड इंजिनिअर म्हणून कार्यरत होते. जहाजावर एकूण २४ कर्मचाऱ्यांचा क्रू होता, त्यापैकी ११ जण भारतीय होते. रविवारी पहाटे ओमानच्या सागरी हद्दीत जहाजावर हल्ला झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, क्षेपणास्त्र थेट जहाजाच्या इंजिन रूम वर आदळल्याने भीषण आग लागली. यामुळे जहाजाची प्रोपल्शन सिस्टिम निकामी झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कर्मचाऱ्यांनी जहाजाला अँकर करून लाईफबोटच्या मदतीने बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर अवघ्या दोन तासांत ओमानच्या रॉयल नेव्ही ने २३ कर्मचाऱ्यांची सुखरूप सुटका केली. मात्र, इंजिन रूमजवळ काम करत असलेले हेरंब करमरकर बेपत्ता होते. अखेर त्यांचा मृत्यू झाल्याची कुटुंबियांनी पुष्टी केली. हल्ल्याच्या काही वेळ आधी, रविवारी पहाटे २:४९ वाजता हेरंब यांनी कुटुंबियांशी शेवटचा संपर्क साधला होता. त्यांनी ‘होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली आहे’ असे सांगितले होते. गेल्या तीन महिन्यांहून अधिक काळ ते समुद्रात कार्यरत होते आणि कामाचा कालावधी पूर्ण करून लवकरच भारतात परतणार होते.

## पहिले हाताचा पंजा छाटला, तो रस्त्यावर टाकून तरुण पळत सुटला : पुढे भयंकर घडलं



### अमरावती मधील थरकाप उडवणारी घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – अमरावती शहरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून अत्यंत थरारक आणि धक्कादायक घटनांमुळे संपूर्ण अमरावती शहर हादरून गेले आहे. आफक शेख या तरुणाची भरदिवसा निर्घृण हत्या करण्यात आली. थरकाप उडवणारी माहिती म्हणजे आफक शेख याला संपवण्याआधी त्याचा हाताचा पंजाच छाटण्यात आला. सदर घटनेने संपूर्ण अमरावती हादरुन गेली आहे. राजेंद्र नगर बेलोकर हॉस्पिटलजवळ आफक शेख या ताज नगर येथील तरुणाची चार अज्ञात आरोपींनी निर्घृण हत्या केली. हत्येपूर्वी या तरुणांनी या युवकाचा हाताचा पंजा छाटून टाकला. पंजा छाटल्यानंतर पळत सुटलेल्या आफाक शेखवर कोयत्याने जोरदार वार केले, या हल्ल्यात आफक शेख या युवकाचा घटनास्थळी मृत्यू झाला. भररस्त्यात हाताचा पंजा सापडल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मात्र युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती आहे. या घटनेतील आरोपी निष्पन्न झाले असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत.

## जयंत पाटील, तटकरे आणि प्रफुल्ल पटेल मुख्यमंत्र्यांच्या भेटीला वर्षावर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – राज्याच्या राजकीय वतुर्ळातून एक अनपेक्षित बातमी समोर आली असून, शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील हे मंगळवारी रात्री अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ’वर्षा’ या शासकीय निवासस्थानी दाखल झाले.



विशेष म्हणजे, अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे आधीपासूनच मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी तिथे उपस्थित होते. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांचा पक्ष ‘एनडीए’सोबत जाण्याबाबत सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर या भेटीला महत्त्व प्राप्त झाले असून, महाराष्ट्रात पुन्हा एकदा मोठे राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हा वाद शमतो न शमतो, तोच मंगळवारी रात्री अचानक तटकरे आणि पटेल हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी ‘वर्षा’ बंगल्यावर पोहोचले. या दोन्ही नेत्यांशी मुख्यमंत्र्यांची चर्चा सुरू असतानाच, अचानक तिथे शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची ‘एन्ट्री’ झाली.

## कोस्टल रोडवरील बोगद्यात धावत्या कारला आग : जीव वाचवण्यासाठी प्रवाशांची धावपळ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – कोस्टल रोडवरील हाजी अली-वरळी बोगद्यात बुधवारी (दि.१५) दुपारी धावत्या कारला अचानक आग लागल्याने एकच गोंधळ उडाला.



आगीमुळे वाहनातील प्रवाशांसह इतर वाहनचालकांनीही जीव वाचवण्यासाठी बोगद्याबाहेर धाव घेतली. या घटनेमुळे कोस्टल रोडवरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली असून, अग्निशमन दल आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## मीरा रोडमध्ये मोठी दुर्घटना टळली! एन.एल. डालमिया शाळेच्या इमारतीला भीषण आग

### विद्यार्थ्यांचे प्राण थोडक्यात वाचले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – मीरा रोड येथील हरे कृष्ण मंदिराजवळ असलेल्या एन.एल. डालमिया शाळेच्या इमारतीच्या वरच्या मजल्यावर बुधवारी सकाळी अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.



सुदैवाने ही घटना शाळा सुरू होण्यापूर्वी घडल्याने मोठी जीवितहानी टळली. घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाल्याचे वृत्त नाही. आगीची माहिती मिळताच मीरा-भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. आग पुन्हा भडकू नये म्हणून सध्या कूलिंग ऑपरेशन सुरू असून संपूर्ण इमारतीची तपासणी केली जात आहे.


## फुटबॉल पराभवानंतर फ्रान्स पेटला!

### स्पेनकडून पराभवानंतर चाहत्यांचा संताप, अनेक शहरांत गोंधळ व तोडफफोड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***पॅरिस*** – फिफा विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत स्पेनकडून झालेल्या पराभवानंतर फ्रान्समध्ये काही ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

फ्रान्सच्या संघाचे अंतिम फेरीत पोहोचण्याचे स्वप्न भंगल्यानंतर संतप्त चाहत्यांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. काही ठिकाणी गोंधळ, तोडफफोड आणि जाळपोळीच्या घटना समोर आल्या आहेत.



रस्त्यावर उतरले चाहते : सामना

स्पेनने फ्रान्सचा २-० असा पराभव करत विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. या सामन्यात फ्रान्सचा स्टार खेळाडू किलियन म्बाप्पे अपेक्षित कामगिरी करू शकला नाही. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा विश्वचषक अंतिम सामना खेळण्याचे फ्रान्सचे स्वप्न भंगले. पराभवानंतर सामना संपल्यानंतर फ्रान्समधील काही भागांमध्ये फुटबॉल चाहत्यांमध्ये नाराजी पाहायला मिळाली.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या काही व्हिडीओंमध्ये रस्त्यांवर गर्दी, गोंधळ आणि पोलिसांशी झटापट झाल्याचे दिसून येत आहे.

### मुंबई-गोवा महामार्गावर भीषण दुर्घटना!

## गोव्याहून परतणाऱ्या कुटुंबावर काळाचा घाला : ३ जणांचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***रत्नागिरी*** – मुंबई-गोवा महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघात झाला असून गोव्याहून मुंबईकडे परतणाऱ्या एका कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा रेस्ट हाऊसजवळ बुधवारी (१५ जुलै) सकाळी झालेल्या या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा जागीच मृत्यू, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.




डंपरला कारची जोरदार धडक : माहितीनुसार, मुंबईतील आग्रीपाडा परिसरात राहणारे हे कुटुंब गोव्यातून फिरून क्रेटा कारने मुंबईकडे परतत होते. सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास लांजा रेस्ट हाऊसजवळ त्यांच्या कारने पुढे जात असलेल्या डंपरला मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की क्रेटा कारचा अक्षरशः चुराडा झाला. अपघातात कारमधील दोन महिला आणि एका चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. तर कारमधील अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू : घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना तात्काळ लांजा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.


## अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन महागात

### मुंबईतील ३ प्रसिद्ध रेस्टॉरंटवर मोठी कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***ठाणे*** – शहरातील उंच इमारती, मॉल, रुग्णालये आणि व्यावसायिक संकुलांना अग्निसुरक्षा नियमांचे पालन करण्यासाठी नोटीस बजावणाऱ्या ठाणे महापालिकेच्या स्वतःच्या मुख्यालयातच अग्निसुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

धूर शोधकांपासून अग्निशमन पंपांपर्यंत अनेक महत्त्वाच्या यंत्रणा निकामी किंवा अपुऱ्या अवस्थेत असल्याचे प्रशासनालाच मान्य करावे लागले असून, त्या दुरुस्त करण्यासाठी तब्बल ४३ लाख ३६ हजार ८०० रुपयांचा खर्च करण्याची वेळ महापालिकेवर आली आहे.



विशेष म्हणजे, ही बाब एखाद्या नियमित तपासणीत नव्हे, तर गावदेवी भाजी मंडईतील भीषण आग आणि त्यात दोन निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर समोर आली.

या घटनेमुळे महापालिकेच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेवर सर्वच स्तरांतून प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. सर्वसाधारण सभेत विरोधी सदस्यांनी याच मुद्द्यावरून प्रशासनाला धारेवर धरत, ‘महापालिकेचे मुख्यालयच सुरक्षित नसेल, तर नागरिकांना सुरक्षा कशी देणार?’ असा थेट सवाल उपस्थित केला.



# मते विकत घेण्यासाठी लाडकी बहीण योजनेत अपहार : संजय राऊत

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – निवडणुकीत मते विकत घेण्यासाठी लाडकी बहीण योजनेत ९२ लाख बोगस लाभार्थ्यांना पैसे वाटून तब्बल ३ हजार ५१५ कोटी रुपयांचा सरकारी निधी लुटला गेला, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मंगळवारी केला. या शतकातील हा सर्वात मोठा आर्थिक अपहार असून तत्कालीन शिंदे सरकारच्या मंत्रिमंडळावर गुन्हे दाखल करून संबंधितांची संपत्ती जप्त करावी, अशी मागणीही त्यांनी केली. लाडकी बहीण योजनेत कोणतीही योग्य पडताळणी न करता लाखो लाभार्थ्यांना पैसे वितरित करण्यात आले. त्यात ९२ लाख बोगस लाभार्थी, २९ हजार पुरुष आणि सुमारे ४ हजार ५०० सरकारी कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याचा दावा राऊत यांनी यावेळी केला.

या माध्यमातून सुमारे ३ हजार ५१५ कोटी रुपयांचा सरकारी निधी मतांसाठी वापरण्यात आला.

# त्रिभाषा सूत्राबाबत स्पष्टीकरण मागवले

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली**– इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन मूळ भारतीय भाषांसह एकूण तीन भाषांचा अभ्यास सक्तीचा करणाऱ्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) धोरणाला आव्हान देणाऱ्या दोन नव्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्र सरकार, एनसीईआरटी आणि सीबीएसईकडून स्पष्टीकरण मागवले आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या.व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील आनंद ग्रोव्हर आणि गोपाळ शंकरनारायणन यांच्या युक्तिवादाची दखल घेतली. न्यायालयाने केंद्र सरकार आणि इतर संबंधित संस्थांना नोटीस बजावत १० दिवसांच्या आत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. 'या याचिकांवर पुढील सुनावणी २९ जुलै रोजी होईल,' असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले.

# अमरावती पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गावर स्पिड ब्रेकर लावा

## नगरसेवक तुषार देशमुख यांची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)





**वरुड** – अमरावती पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गावरील वरुड शहरातील न्यू इंग्लिश स्कूल, न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट तसेच रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या ठिकाणी वाहने भरधाव वेगाने धावत असल्यामुळे वारंवार अपघात होत असून अनेक निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत तर काही जणांना अपघातामध्ये कायमस्वरुपी अपंगत्वाला सामोरे गेले आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत नगरसेवक तुषार देशमुख यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे या तिन्ही ठिकाणी तातडीने स्पीड ब्रेकर उभारण्याची मागणी केली आहे.

विद्यार्थी, पालक, नागरिक आणि पादचारी यांची दररोज मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्याने या ठिकाणी वेग नियंत्रणासाठी स्पीड ब्रेकर, आवश्यक सूचना फलक आणि झेब्रा क्रॉसिंगची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

अपघातांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने महामार्ग प्राधिकरणाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन अपघातांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने महामार्ग प्राधिकरणाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन या ठिकाणी स्पीड ब्रेकर उभारावेत, अशी मागणी सुध्दा तुषार देशमुख यांनी केली आहे.

# २ कार्यालयांना १ तलाठी : नागरिकांची प्रचंड गैरसोय

## २४ हजार सातबाराचा कारभार एकाकडे : इतरही कामांचा प्रचंड बोझा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)





**वरुड** – वरुड शहरातील महसुल प्रशासनाची अवस्था गेल्या जवळपास एका वर्षापासून अत्यंत चिंताजनक बनली आहे. शहरातील दोन तलाठी कार्यालयाचा कारभार सद्य: केवळ एका तलाठ्याकडे असल्याने नागरिकांना विविध महसुली कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, वारसा नोंद, फेरफार, पीक नोंदणी, ई-पीक पाहणी, विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे अशा अनेक कामांसाठी नागरिकांना वारंवार तलाठी कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. वरुड शहरात भाग-१ आणि भाग-२ अशी कार्यालये वेगवेगळी असून या कार्यालयांतर्गत तब्बल २४ हजार सातबारा असून इतरही अनेक कामे आहेत.

वरुड शहर आणि भाग-१ आणि भाग-२ या अंतर्गत अंदाजे दीड लाख लोकसंख्या असून अनेकांना दररोज विविध प्रमाणपत्रांची कामे असतात, अनेक नागरिक तलाठी कार्यालयात येतांना आपली कामे लवकर व्हावी, या उददेशाने येतात परंतु तलाठी इतर कामामध्ये व्यस्त असल्यामुळे नागरिकांना सतत कार्यालयाच्या येरझाऱ्या माराव्या लागतात. एकाच अधिकाऱ्यावर दोन सजांचा अतिरिक्त भार असल्याने सर्व कामे वेळेत पूर्ण करणे शक्य होत नसल्याचे चित्र आहे.

त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असून अनेकांची कामे आठवड्याचे आठवडे प्रलंबित राहतात. विशेषतः शेतकरी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि विविध शासकीय योजनांचे लाभार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

गेल्या वर्षभरापुर्वी तलाठी बदलून गेले आणि तेव्हापासुन भाग-१ चा कारभार पाहात असलेल्या तलाठयाकडे भाग-२ चा सुध्दा कारभार सोपविण्यात आला, एकीकडे किमान १ हजार सातबारा साठी एका तलाठयाची नेमणुक केली जाते मात्र वरुड शहरातील तब्बल अंदाजे २४ हजार सातबारे असतांना सुध्दा केवळ एक तलाठी हा कारभार कसा करीत असेल? याची कल्पना सुध्दा न केलेली बरी.

महसूल विभागाने ही परिस्थिती गांभीर्याने लक्षात घेऊन वरुड शहरातील रिक्त तलाठी पदावर तातडीने स्वतंत्र तलाठी नियुक्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. वाढती लोकसंख्या आणि वाढते प्रशासकीय कामकाज लक्षात घेता एका तलाठ्यावर दोन सजांचा भार टाकणे नागरिकांच्या हिताचे नसल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

प्रशासनाने तातडीने या प्रश्नाकडे लक्ष देऊन स्वतंत्र तलाठी नियुक्तीचा निर्णय घेतल्यास नागरिकांची गैरसोय दूर होऊन महसुली कामकाजाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सरसकट कर्जमाफीवर शिक्कामोर्तब : २०१९ च्या योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना नियमित लाभ, शेतकऱ्यांना मोठा दिलासा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्य सरकारच्या महात्मा जोतीराव फुले शेतकरी सन्मान २०१९ च्या योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेवर मंगळवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयामुळे १३ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे.

सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तवावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी २०१९ च्या योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना ५० हजार ऐवजी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचे जाहीर केले होते.

या पार्श्वभूमीवर मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'च्या निकषात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही शेतकरी कर्जमुक्ती योजना' सरकारने यापूर्वीच जाहीर केली आहे.

दापचरीत आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार -रावल पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील दापचरी येथे ५५८.४३ हेक्टर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर पणनमंत्री जयकुमार रावल यांनी या निर्णयाची माहिती दिली. वाढवण बंदरापासून अवघ्या ४० किमी अंतरावर उभारण्यात येणारा हा प्रकल्प फ्रान्समधील रुंगीस मार्केट, नेदरलँड्समधील रॉयल फ्लोरा हॉलंड तसेच रॉटरडॅम बंदर परिसरातील आधुनिक कृषी लॉजिस्टिक व्यवस्थेच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे. पुनर्वसनाच्या अनुदानात वाढ अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ अंतर्गत शिक्षा भोगत असलेले बंदी, मुक्तबंदी, परिविक्षाधीन यांच्या पुनर्वसनार्थ देण्यात येणाऱ्या आर्थिक सहायक अनुदानामध्ये २५ हजार रुपयांची वाढ करण्यास आणि या योजनेमध्ये निर्दोष मुक्त झालेल्या बंद्यांचाही समावेश करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

# सुनेत्रा पवार यांची निवड कायदेशीर

## प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंचा निर्वाळा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर** – मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची झालेली निवड कायदेशीर, पक्षाच्या घटनेनुसार आणि सर्व नियमांचे पालन करूनच करण्यात आल्याचा निवार्ळा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मंगळवारी केला.

पक्षाचे माजी राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी सुनेत्रा पवार यांच्या निवडीला कायदेशीर आव्हान दिल्यानंतर पक्षात विसंवाद असल्याची चर्चाही त्यांनी फेटाळून लावली. सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्ष निवडीला पक्षातून आव्हान देण्यात आले आहे. याशिवाय पक्षाचे नेते प्रफुल पटेल हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि नेते पार्थ पवार यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी पत्रकारांशी बोलताना तटकरे म्हणाले, राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक होती. पक्षाच्या संविधानातील सर्व तरतुदी आणि लोकशाही पद्धतींचे पालन करूनच ती पार पडली आहे.

सच्चिदानंद सिंह यांनी पाठविलेल्या कायदेशीर नोटिशीचा अभ्यास करून गरज असेल तरच त्याला कायदेशीर मार्गाने उत्तर दिले जाईल. अन्यथा या नोटीसला केराची टोपली दाखवली जाईल. त्यांनी केलेल्या आरोपांना कोणताही आधार नाही. पक्षात कोणतीही फूट किंवा मतभेद नाहीत. काही जण विनाकारण वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

# पोपटांनी मांडला हैदोस मोसंबी फळाचे होताहेत नुकसान

## अनेक युक्त्या निष्प्रभ्र, फळाचा झाडाखाली सडा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – आंबिया बहाराची फळे झाडावर असताना थवेच्या थवे झाडावर बसून फळावर टोची मारुन गळुन पडलेला सडा जमिनीवर पाहून अनेक मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांचे अवसान गळाले, यात लाखोंचे नुकसान झालेले दिसत आहे. आधीच निसर्गाचा लहरीपणा, वाढता कृषी निविष्टाचा उत्पादन खर्च, पिकांना मिळणारा तोट्याचा भाव त्यात हे एक नवीन संकट उभे राहिले आहे.

वरुड मोर्शी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर मोसंबीची लागवड केली आहे. अंबिया बहाराची मोसंबी फळे पुढील महिन्यापासून परिपक्क होऊन विक्रीसाठी उपलब्ध होतात. यंदा प्रचंड उन्हाचा तडाखा, गारपीट, अवकाळी पावसाच्या तावडीतून बचावलेल्या संत्रा, मोसंबी बागा आता यंदा नवीनच प्रकाराने मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना पोपटांनी नाकीनऊ आणले आहे.

एकाचवेळी हजारोंच्या संख्येने थवेच्या थवे पोपट मोसंबी बागांवर ताव मारून डोळ्यादेखत झाडाखाली सडा पाडतात. नजीकच्या बेलोरा (ताथोडे ), भापकी , नांदगाव, आलोडा, गाडेगाव, राजूरा बाजार, अमडापूर, मोरचूंद, चिंचरगव्हण, वंडली, वघाळ सह परिसरातील मोसंबी शेतीत पोपटांनी मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना जेरीस आणले आहे. मोसंबी बागेतील पोपट हाकलुन, बंदोबस्त लावण्यासाठी नाना युक्त्या, फटाखे, ढोल वाजवून, आवाजाचा भोंगा, कडू किटकनाशके वापरुन निष्प्रभ्र होऊन मोसंबी उत्पादक शेतकरी हाती आलेली मोसंबी फळे एका झाडाखाली शेकडो फळे टोची मारुन गळालेली दिसत असल्याने शेतकरी हैराण झाला आहे.

पोपटांचा उच्छाद पाहून शेतकरी हतबल झाला आहे. एकावेळी येवून टोचा मारुन गळालेली फळे शेतीच्या बांधावर फेकून द्यावे लागत असल्याने शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र या नवीन प्रकारामुळे वरुड तालुक्यातील मोसंबी उत्पादक शेतकरी अचंबित झाला आहे.



"यंदा हातूर्णा, बेलोरा, भापकी, आलोडा शेतशिवारात हा नवीनच प्रकार आढळून आल्याने हाती आलेला माल डोळ्यादेखत फळे टपकत आहे. या प्रकाराने शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान होत असल्याने शेतीचे इतर कामे बंद ठेऊन पोपट हाकलवुन लावण्यासाठी सकाळ पासून सायंकाळ पर्यंत शेतात हजेरी लावावी लागत असल्याने शेतीचे इतर कामावर परिणाम होत आहे, अशी प्रतिक्रिया अमडापूर येथील मोसंबी उत्पादक राजाभाऊ गुडधे यांनी व्यक्त केली.

# संपादकीय

**खरी श्रीमंती पैशाने नव्हे, तर चांगल्या विचारांनी मोजली जाते.**

## अणुकरारापासून रणनीतिक भागीदारीपर्यंतचा ऐतिहासिक प्रवास

जागतिक राजकारणाच्या बुद्धिबळावर सध्या वेगाने हालचाली होत आहेत. या बदलत्या भौगोलिक-राजकीय परिस्थितीत भारताचे परराष्ट्र धोरण अधिक आक्रमक, व्यावहारिक आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणारे ठरत आहे. नुकताच झालेला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ऑस्ट्रेलिया दौरा या बदलत्या धोरणाचा आणि भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचा एक भक्कम पुरावा आहे. एकेकाळी अणुचाचणीवरून भारतावर निर्बंध लादणाऱ्या ऑस्ट्रेलियाने आज भारताला युरेनियम पुरवठा करण्याचा आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रात खांद्याला खांदा लावून काम करण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रवास केवळ दोन देशांमधील व्यापारी करारापुरता मर्यादित नसून, तो भारताच्या वाढत्या रणनीतिक आणि राजनैतिक महत्त्वाचा जागतिक ठसा उमटवणारा आहे.

इतिहास: पोखरण ते अविश्वास भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील संबंधांचा भूतकाळ नेहमीच सुवर्णकाळ नव्हता. १९९८ मध्ये जेव्हा भारताने पोखरण येथे दुसरी यशस्वी अणुचाचणी केली, तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या प्रतिक्रियेत तीव्र नाराजी आणि विरोध होता. ऑस्ट्रेलियाने भारतावर कठोर आर्थिक आणि व्यापारी निर्बंध लादले होते. भारताला 'अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर' स्वाक्षरी न केल्यामुळे युरेनियम देण्यास स्पष्ट नकार दिला होता. त्या काळात ऑस्ट्रेलिया हा अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चिमात्य विचारसरणीचा कट्टर पाठीराखा होता आणि भारताकडे संशयाच्या नजरेने पाहिले जात होते.

पोखरणनंतरच्या त्या काळात निर्माण झालेला हा राजनैतिक दुरावा पुढील अनेक वर्षे दोन्ही देशांमधील अविश्वासाचे कारण बनून राहिला. बदलते वळण: युरेनियम पुरवठ्याचा ऐतिहासिक करार काळ बदलला, तशी जागतिक गणितेही बदलली.

भारताने आपल्या जबाबदार अणुशक्ती असण्याचा जगभरात विश्वास निर्माण केला. 'नो फर्स्ट युज' म्हणजेच पहिल्यांदा अण्वस्त्राचा वापर न करण्याच्या भारताच्या धोरणामुळे ऑस्ट्रेलियाचा भारतावरील विश्वास वाढला. या विश्वासाचे रूपांतर अखेर २०१४ मधील ऐतिहासिक युरेनियम पुरवठा करारात झाले. ऑस्ट्रेलियाने आपल्या देशांतर्गत धोरणात बदल करून, एनपीटीवर स्वाक्षरी न केलेल्या भारताला नागरी अणुऊर्जेसाठी युरेनियम देण्याचे मान्य केले. हा निर्णय म्हणजे केवळ एका धातूचा पुरवठा नसून, भारताच्या अण्विक प्रतिमेला मिळालेली आंतरराष्ट्रीय मान्यता होती. सध्याच्या दौऱ्यात या पुरवठ्याला अधिक गती देणारे आणि सुरळीत करणारे करार झाले आहेत, ज्यामुळे भारताच्या वाढत्या ऊर्जा गरजांना आणि पर्यावरणास अनुकूल उद्दिष्टांना मोठी ताकद मिळणार आहे.

इंडो-पॅसिफिकमधील रणनीतिक भागीदारी आणि 'क्वाड' आजच्या घडीला भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मैत्रीचा सर्वात मोठा केंद्रबिंदू म्हणजे 'इंडो-पॅसिफिक' क्षेत्र आहे. दक्षिण चीन समुद्रात चीनची वाढती दादागिरी आणि विस्तारवादी धोरण या दोन्ही देशांसाठी चिंतेचा विषय आहे.

## राशिभविष्य

**मेष :** एखादा जुना प्रश्न नव्या दारातून उत्तर देईल. घाईपेक्षा शांततेचा वेग जास्त परिणामकारक ठरेल. अनपेक्षित व्यक्ती तुमचा आरसा बनेल.

**तूळ :** आज समतोल शोधू नका, तो स्वतः येईल. एखाद्या हास्यात लपलेला संदेश मिळेल. निर्णय मन आणि बुद्धीने घ्या.

**वृषभ :** वस्तूंपेक्षा आठवणी मौल्यवान वाटतील. हट्टाला थोडी विश्रांती दिली तर नशीब बोलू लागेल. खर्चापेक्षा समाधानाची कमाई मोठी ठरेल.

**वृश्चिक :** शांत चेहऱ्यामागे मोठी ताकद दडलेली असेल. विश्वासाची किंमत वाढेल. अपूर्ण संवाद पूर्ण कराल. स्वतःवर संशय घेऊ नका.

**मिथुन :** दोन वाटा दिसल्या तर तिसरीही शोधून पाहा. शब्दांपेक्षा विरामचिन्हे जास्त बोलतील. अचानक आलेली कल्पना जपून ठेवा.

**धनू :** प्रवास नसेल तरी विचार दूरवर जातील. नवीन शिकण्याची भूक भागवणारा क्षण मिळेल. एखादं वाक्य दिवसाचा दिशादर्शक बनेल.

**कर्क :** कुणीतरी मन मोकळं करेल. काळजीतून बाहेर पडा. जुन्या फोटोमध्ये नवा अर्थ दिसेल. प्रेम व्यक्त करण्यासाठी थेट बोला.

**मकर :** शिस्तीतही सर्जनशीलतेला जागा द्या. जुनी मेहनत फळ दाखवेल. शांत निर्णय मजबूत ठरेल. उद्याची चिंता करू नका.

**सिंह :** दिवा लावणारे बना. कौतुक अनपेक्षित दिशेने येईल. एका 'नाही' मुळे मोठं 'हो' मिळेल. आत्मविश्वासाला नम्रतेची जोड द्या.

**कुंभ :** वेगळेपण लपवू नका, तेच तुमचं बळ आहे. अनोळखी कल्पना मित्र होईल. एका छोट्या कृतीने मोठा बदल सुरू होईल.

**कन्या :** सौंदर्य उमजेल. छोट्या बदलाने मोठा फरक जाणवेल. कागदावर उतरवलेली कल्पना उंच भरारी घेईल. शांत झोप लागेल.

**मीन :** स्वप्नांना वास्तवाचा स्पर्श मिळेल. पाण्यासारखे विचार वाहू द्या. कला, संगीत किंवा कविता मन उजळवेल. कृतज्ञ वाटेल.

# महाराष्ट्राच्या बदनामीचे घाऊक कंत्राटदार



नुकत्याच झालेल्या पावसात मुंबई-पुणे रस्ते मार्गावरील कनेक्टिंग लिंकशेजारी दरडीचा भाग कोसळला. परिणामी या बोगद्यातून होणारी वाहतूक काही काळ बंद ठेवावी लागली. रस्ते विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे ही वाहतूक १८ तासांनी पूर्ववत सुरू झाली. मात्र तोपर्यंत या मुद्द्यावरून महायुती सरकार, भारतीय जनता पक्ष आणि विशेषतः देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात राज्यातील विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आणि समाज माध्यमांवरील भाजप विरोधकांच्या टोळक्यांनी अपप्रचार आणि अफवांच्या माध्यमातून अक्षरशः नंगानाच घातला.

कनेक्टिंग लिंक पडली, कनेक्टिंग लिंकला भगदाड पडले, राज्य सरकारने यासाठी खर्च केलेले सात हजार कोटी पाण्यात गेले, अशा प्रकारच्या नाना अफवा पसरवून विरोधकांनी तसेच भाजप विरोधकांचे कंत्राट घेतलेल्या समाज माध्यमांवरील टोळ्यांनी आपली विरोधाची विकृत हौस भागवून घेतली. कनेक्टिंग लिंकवरील वाहतूक बंद पडली याचा या मंडळींना असुरी आनंद झाला होता. त्याचे निमित्त करून या मंडळींच्या पोटात साचलेली भारतीय जनता पक्षाच्या आणि महायुतीच्या विरोधातील सगळी घाण बाहेर पडली. यात इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांतील काही मंडळींचाही समावेश होता. अनेक प्रयत्न करूनही विधानसभा आणि नंतर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि त्यांचे बंधू राज ठाकरे यांच्या आघाडीला यश मिळू न शकल्याने प्रसार माध्यमांतील अनेक जुनेजाणते कोमात गेले होते. त्यांनाही आपली भाजप विरोधाची मळमळ बाहेर काढण्याची संधी मिळाली. या टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात तडाखेबंद उत्तर दिल्यावर अनेकांना मिरच्या झोंबल्या.

सरकारच्या कामावर टीका करायची नाही का, प्रश्न उपस्थित करायचे नाहीत का, असे म्हणत या मंडळींनी कांगावा सुरू केला. मुळात प्रश्न असा आहे की कनेक्टिंग लिंकबद्दल प्रश्न उपस्थित केले म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्षेप घेतला नव्हता. आक्षेप होता तो कनेक्टिंग लिंकचा बोगदा कोसळला वगैरे वगैरे अफवा पसरवून या मंडळींनी एका चांगल्या प्रकल्पाबद्दल खोटी माहिती जनतेमध्ये पसरविण्याचा उद्योग केला. महाराष्ट्रात चुकीच्या पद्धतीने बांधकामे करून महायुती सरकार जनतेचा कररूपी पैसा पाण्यात घालत आहे, या प्रकारांना देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार आहेत, असा खोटा प्रचार या मंडळींनी समाज माध्यमांवर केला. मिसिंग लिंक प्रकल्पाच्या बोगद्याच्या प्रवेशद्वाराजवळ झालेल्या नैसर्गिक दरड कोसळण्याच्या घटनेनंतर काही मविआ नेत्यांनी कोणतीही तांत्रिक माहिती न घेता या प्रकल्पावर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यास सुरुवात केली. मिसिंग लिंक प्रकल्पाचा बोगदा फुटलेला नव्हता, बोगद्यामध्ये पाणी शिरलेले नव्हते. मिसिंग लिंक प्रकल्पाच्या मुख्य संरचनेला कोणतेही नुकसान झालेले नव्हते. दरड कोसळली ती बोगद्याच्या बाहेरील डोंगराच्या उतारावर. ही पूर्णपणे नैसर्गिक भूगर्भीय घटना होती. जगातील सर्वात आधुनिक रस्ते आणि बोगद्यांच्या प्रकल्पांमध्येही अशा नैसर्गिक घटना घडतात. त्याचा अर्थ निकृष्ट बांधकाम किंवा भ्रष्टाचार असा होत नाही.

# विकास, की विकासाचा ऱ्हास?

**'प्रजा' संस्थेच्या २०२६ च्या अहवालातून मुंबईतील कचरा, प्रदूषण, वाहतूक आणि इतर नागरी समस्यांचे गंभीर चित्र समोर आले आहे. शहराचा विकास खऱ्या अर्थाने साधायचा असेल, तर या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे अहवालातून स्पष्ट होते.**



पावसाने उघडीप देताच मुंबईकरांनी सुटकेचा निश्वास टाकला असला तरी शहरासमोर उभ्या असलेल्या नागरी समस्यांचे ढग काही हटलेले नाहीत. रस्त्यांवर पाणी तुंबणे, रेल्वे आणि रस्ते वाहतूक विस्कळीत होणे, कार्यालयात पोहोचण्यास होणारा विलंब, सखल भागांत पाणी साचणे, हवामानातील बदल आणि मनुष्यबळाची कमतरता यांसारख्या प्रश्नांनी आर्थिक राजधानीची घुसमट सुरूच आहे. यंदाच्या पावसाने तर या समस्यांना अधिक गंभीर रूप दिले. मॅनहोलमध्ये नागरिक(चणालरळ) पडण्याच्या घटना, शाळेच्या बसवर झाड कोसळून विद्यार्थ्याचा मृत्यू, महापौरांच्या उपस्थितीतच मॅनहोलमध्ये व्यक्ती पडल्याची घटना आणि मोठ्या प्रमाणावर झाडे उन्मळून पडणे या घटनांनी पालिकेच्या तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या घटनांनंतर विरोधकांनी पालिकेवर टीकेची झोड उठवलीच; पण सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधींनीही महापौर आणि पालिका प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले. आरोप-प्रत्यारोपांच्या या गदारोळात 'प्रजा' संस्थेने प्रसिद्ध केलेला मुंबई महानगरपालिकेच्या नागरी सेवा, पर्यावरण आणि हवामानविषयक स्थितीचा २०२६ चा अहवाल फारसा चर्चेत आला नाही. प्रत्यक्षात हा अहवाल मुंबईच्या भविष्यासाठी गंभीर इशारा देणारा आहे. अहवालातील आकडेवारी सांगते की, गेल्या दशकात मुंबईकरांच्या नागरी तक्रारींमध्ये तब्बल ५९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०१६ मध्ये ८१ हजारांहून अधिक असलेल्या तक्रारी २०२५ मध्ये १.३० लाखांवर पोहोचल्या. प्रदूषणासंबंधीच्या तक्रारींमध्ये ५३१ टक्के, तर घनकचरा व्यवस्थापनासंबंधीच्या तक्रारींमध्ये २८१ टक्के वाढ झाली आहे. यावरून शहरातील नागरी समस्यांची तीव्रता किती वाढली आहे, याची कल्पना येते.

सकारात्मक बाब म्हणजे तक्रार निवारणाचा कालावधी काही प्रमाणात कमी झाला आहे. २०२१ मध्ये तक्रार निकाली काढण्यासाठी सरासरी ४८ दिवस लागत होते, ती मुदत आता ३० दिवसांवर आली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाने तर हा कालावधी ४० दिवसांवरून अवघ्या आठ दिवसांपर्यंत आणला आहे. मात्र, केवळ तक्रारींचा निपटारा जलद होणे म्हणजे समस्या सुटल्या, असे म्हणता येणार नाही. स्वच्छतेच्या बाबतीतही मुंबईची स्थिती समाधानकारक नाही. 'गार्बेज-फ्री सिटी'चा दर्जा मिळवण्यात शहर अपयशी ठरले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील एक-स्टार दर्जासाठी आवश्यक निकषही पूर्ण करता आलेले नाहीत. मुंबईतील २ हजार ७४९ मोठ्या गृहनिर्माण संस्थांपैकी केवळ ३४७ संस्था आपल्या परिसरात कचऱ्यावर प्रक्रिया करतात. उर्वरित ८७ टक्के संस्था आजही कचरा प्रक्रियेबाबत उदासीन आहेत. विकेंद्रीकृत कचरा व्यवस्थापनाची ही अपयशी अंमलबजावणी भविष्यातील मोठे संकट ठरू शकते. पर्यावरणाच्या आघाडीवर चित्र आणखी चिंताजनक आहे. मिठी नदीतील वाढते प्रदूषण, समुद्रकिनाऱ्यांची ढासळणारी स्वच्छता आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची निकृष्ट कामगिरी यामुळे पर्यावरणीय धोके वाढत आहेतत्यातच वाढती बांधकामे, वाहनांची संख्या आणि धुळीमुळे हवेची गुणवत्ता सातत्याने खालावत असून श्वसनविकारांसह विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवरही मुंबईची तयारी अपुरी असल्याचे स्पष्ट होते. हवामान कृती आराखड्यात २४ महत्त्वाच्या कृतींचा समावेश असला, तरी त्यातील बहुतांश बाबींच्या अंमलबजावणीची विश्वासार्ह माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे या आराखड्याची परिणामकारकता मोजणेच कठीण झाले आहे. दरवर्षी मुसळधार पावसानंतर शहरातील सखल भाग जलमय होतात, वाहतूक ठप्प होते आणि नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होते.

२००५ च्या महापुरानंतर अनेक घोषणा झाल्या, हजारो कोटींची कामे झाली; तरी आजही परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला दिसत नाही. पालिकेतील रिक्त पदांची स्थितीही चिंताजनक आहे. मंजूर १.४६ लाख पदांपैकी सुमारे ५९ हजार पदे रिक्त आहेत. म्हणजेच तब्बल ४० टक्के मनुष्यबळाची कमतरता आहे. अशा परिस्थितीत दर्जेदार नागरी सेवा देण्याचे आव्हान अधिक कठीण बनते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असली, तरी केवळ उंच इमारती, सागरी पूल किंवा भव्य प्रकल्प यांमुळे शहर जागतिक दर्जाचे ठरत नाही. नागरिकांना सुरक्षित रस्ते, स्वच्छ परिसर, सक्षम जलनिस्सारण व्यवस्था, पर्यावरणपूरक विकास आणि उत्तरदायी प्रशासन मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. यंदाच्या पावसाने आणि 'प्रजा'च्या अहवालाने एकच संदेश दिला आहे, मुंबईला आता तात्पुरत्या उपायांची नव्हे, तर दीर्घकालीन, नियोजनबद्ध आणि नागरिककेंद्रित बदलांची गरज आहे. अन्यथा प्रत्येक पावसाळा शहराच्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे करत राहील.

# नेहमी सेवेसाठी तत्पर असणारे सामाजिक कार्यकर्ते : महेश बोरकुटे



समाजसेवा म्हणजे केवळ भाषणे करणे नव्हे, तर कृतीतून समाजाप्रती आपली बांधिलकी दाखवणे होय. हीच बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींपैकी एक नाव म्हणजे महेश बोरकुटे.

वरुड शहराच्या सामाजिक आणि सहकारी चळवळीत महेश बोरकुटे हे परिचित नाव आहे. ते जायंट्स ग्रुप ऑफ वरुड या सामाजिक संस्थेचे कोषाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतात. हिशोबातील पारदर्शकता आणि शिस्तबद्ध कारभारासाठी ते ओळखले जातात. संस्थेच्या प्रत्येक उपक्रमासाठी आर्थिक नियोजन करण्यापासून ते निधी उभारणीपर्यंत ते नेहमीच पुढाकार घेतात.

त्याचबरोबर हरी सेवा फाउंडेशन या सेवाभावी संस्थेचे ते सक्रिय सदस्य आहेत. गरजू रुग्णांना मदत, रक्तदान शिबिरे, अन्नदान, शैक्षणिक मदत अशा विविध सामाजिक कार्यात ते अग्रेसर असतात. कोणत्याही संकटाच्या वेळी पहिल्यांदा हात पुढे करणारा चेहरा म्हणजे महेश बोरकुटे.

व्यवसायाने ते सरकारी-निमसरकारी पतसंस्थेमध्ये वसुली अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या क्षेत्रातही त्यांनी आपल्या प्रामाणिकपणा आणि मृदू स्वभावामुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे. कर्ज वसुली करताना सभासदांशी आपुलकीने बोलून, त्यांच्या अडचणी समजून घेऊन मार्ग काढण्याची त्यांची पद्धत सर्वांना भावते. सहकार क्षेत्रातील त्यांचा हा अनुभव त्यांना सामाजिक कामातही उपयोगी पडतो.

महेश यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते कधीच प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहतात. 'माणसाने माणसासाठी जगावे' हे तत्व ते आचरणात आणतात. तरुणांसाठी ते प्रेरणास्थान आहेत. कोणत्याही सामाजिक उपक्रमात ते आपले योगदान न चुकता देतात.

आज रोजी त्यांचा वाढदिवस आहे. या निमित्ताने जायंट्स ग्रुप वरुड, हरी सेवा फाउंडेशन आणि त्यांच्या सर्व मित्र-परिवाराकडून त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

ईश्वर त्यांना निरोगी दीर्घायुष्य देवो आणि त्यांच्या हातून अशीच समाजसेवा घडत राहो, हीच प्रार्थना.

**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा महेश जी!**



**शेषराव नर्मदा गोपाळ कडू**
**वरुड, मो. नं. ९९२३९८८७३४**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# खासदार विलीनीकरणाचा दावा करू शकत नाहीत!

## बंडखोर खासदारांना शिवसेना ठाकरे गटाचे पत्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सहा बंडखोर खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत विलीनीकरणाचा दावा केल्यानंतर आता ठाकरे गटाकडूनही त्यांना कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली आहे. ठाकरे गटाचे संसदीय नेते अरविंद सावंत यांनी १३ जुलै रोजी ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांच्यासह सहा बंडखोर खासदारांना पत्र पाठवून विलीनीकरणाचा निर्णय मूळ नेतृत्व घेऊ शकते. खासदार स्वतःहून विलीनीकरणाचा दावा करू शकत नाहीत. असे झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा या खासदारांना देण्यात आला आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडून आलेल्या लोकसभेतील ९ पैकी सहा खासदारांनी बंड केले आहे.



# वीजचोरी विरोधातील कारवाई तीव्र : अदाणी इलेक्ट्रिसिटीकडून ४८६ गुन्हे दाखल

## ४३.३९ कोटींची वीजचोरी उघड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – वीजचोरी विरोधात मोहिम अधिक तीव्र करत अदाणी इलेक्ट्रिसिटीने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४८६ वीजचोरांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर छाप्यांमध्ये ७९.२५ टन अवैध वायरी जप्त केल्या असून १.९८ कोटी युनिट वीजचोरी पकडली आहे. या विजेची किंमत ४३.३९ कोटी रुपये आहे.




आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये अदाणी इलेक्ट्रिसिटीने वीजचोऱ्या पकडण्यासाठी ३६ हजार ७२० छापे घातले. यात ४० टक्के छापे हे सकाळी लवकर किंवा रात्री उशिरा किंवा सुट्टीच्या दिवशी मारण्यात आले होते. त्यामुळे आणखी ५८९७ वीज चोरीची प्रकरणे नोंदवण्यात आली. कंपनीच्या मते, वीजचोरीविरोधातील सातत्यपूर्ण कारवाईमुळे एकूण एटी अँड सी तोटा ४.७० टक्क्यांवरून ४.४६ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे नियमितपणे वीजबिले भरणाऱ्या ग्राहकांवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार असून, राष्ट्रीय स्तरावर सर्वात कमी एटी अँड सी तोटा असलेल्या वीज वितरण कंपन्यांमध्ये अदाणी इलेक्ट्रिसिटीचा समावेश झाला आहे.

दक्षता विभागाने वर्षभरात अनेक मोठ्या वीजचोरीच्या घटना उघडकीस आणल्या. त्यामध्ये ७ नोव्हेंबर २०२५ रोजी मालाड पश्चिम येथील स्वस्तिक कंपाउंडमध्ये मोल्डिंग युनिटसाठी थेट वीजचोरी पकडली. चोरीच्या विजेची किंमत १.६३ कोटी रुपये होती.

# प्रेम प्रकरणातून १७ वर्षीय तरुणीची हत्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबईच्या कांदिवली सामता नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये १७ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या हत्याप्रकरणी समता नगर पोलिसांची मोठी कारवाई केली. अल्पवयीन मुलीचा प्रियकरानी मुलीचा चाकूने गळा कापून हत्या करून जंगलात मृतदेह फेकून दिला होता. जंगलात वन विभागाच्या अधिकाऱ्याकडून पेट्रोलिंग करत असताना अनोळखीचा मृतदेह सापडला. या संदर्भात वन विभागाकडून समता नगर पोलिसांना माहिती देण्यात आली, समता नगर पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेऊन मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला. यानंतर मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी हरवलेली मुलींचे शोध सुरू केला, अवघ्या काही तासांमध्ये मुलीचं ओळख पटवून समता नगर पोलिसांनी हत्येचा उलगडा लावला. मुलीच्या हत्याप्रकरणी समता नगर पोलिसांनी आरोपी सूरज वाघमारे (२२) याला अटक केली आहे, अटक आरोपी हा कांदिवली पूर्व येथील रहिवासी आहे.

# नायर रुग्णालयातील सेवा कार्यान्वित

## महापौरांसह विविध मान्यवरांनी केली पाहणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बृहन्मुंबई महानगरपालिका संचलित व मुंबई सेंट्रलस्थित बा. य. ल. नायर धर्मादाय रुग्णालयातील अत्याधुनिक आणि नवनिर्मित अशा 'अपघात आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा विभाग संकुल' कार्यान्वित करण्यात आला आहे.

नायर रुग्णालयातील सदर अपघात व आपत्कालीन वैद्यकीय सेवा संकुलाचे समारंभपूर्वक लोकार्पण करण्याचे नियोजित होते. तथापि, कतार देशाचे 'पिता अमीर', माजी अमीर शेख हमद बिन खलिफा अल थानी यांचे १२ जुलै २०२६ रोजी निधन झाले. त्यामुळे केंद्र शासनाने भारतात एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला असल्याने नायर रुग्णालयातील सदर लोकार्पण सोहळा रद्द करण्यात आला. यावेळी शेख हमद बिन खलिफा अल थानी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. वैद्यकीय सेवा सुरू करण्याची



प्राथमिकता व आवश्यकता पाहता, महापौर रितू तावडे यांनी या नवीन संकुलाची पाहणी केली व त्यानंतर सेवा कार्यान्वित करण्यात आली. असे आहे संकुल राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग अर्थात नॅशनल मेडिकल कमिशन यांच्याद्वारे विहित किमान मानक आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी नायर रुग्णालयात अत्याधुनिक अपघात व आपत्कालीन वैद्यकीय सेवा विभागाची निर्मिती करण्यात आली आहे.

# दुबार पेरणीसाठी डीपीडीसीमधून मोफत बियाणे

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बोगस बियाण्यांमुळे पीक न उगवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होऊन दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांना स्वखर्चाने बियाणे खरेदी करावे लागणार नाही. अशा बाधित शेतकऱ्यांना जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) निधीतून मोफत बी-बियाणे उपलब्ध करून दिले जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय



घेतल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी दिली. राज्यात अनेक ठिकाणी विशेषतः अमरावती, अकोला, नागपूर आणि इतर भागात पुरवठादाराने बोगस बियाणे दिल्यामुळे सोयाबीन आणि कापसाचे पीक उगवले नसल्याच्या तक्रारी आल्या आहेत. पीक पेरणीनंतर ते न उगवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे उद्ध्वस्त झाल्यास शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिक भुर्दंड पडू नये, म्हणून राज्य सरकारने मोफत बियाणे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. या निर्णयानुसार पालकमंत्री आपल्या जिल्ह्यातील 'डीपीडीसी' निधीतून शेतकऱ्यांना बियाण्यांसाठी निधी आणि बियाणे उपलब्ध करून देतील, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

### शेत रस्त्यांसाठी डिजिटल 'डॅशबोर्ड'

शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी योग्य रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी सरकारने एक विशेष डिजिटल प्लॅटफॉर्म आणि डॅशबोर्ड तयार केला आहे. या माध्यमातून शेत रस्त्यांची मोजणी करणे, रस्ते खुले करणे आणि त्यांना क्रमांक देणे या प्रक्रिया गतिमान केल्या जातील. या प्लॅटफॉर्मद्वारे प्रत्येक शेतकऱ्याच्या रस्त्याबाबतच्या तक्रारीचे थेट मॉनिटरिंग (लक्ष) केले जाईल आणि त्याचे क्रियान्वयन लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात सुरू होईल, अशी माहितीही महसूल मंत्र्यांनी दिली.

# एकनाथ खडसेंची भाजपमध्ये घरवापसी?

## उत्तर महाराष्ट्रात राजकीय चर्चांना उधाण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**जळगाव** – उत्तर महाराष्ट्रात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगत असताना,



ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या भाजपमधील संभाव्य घरवापसीच्या चर्चांनी पुन्हा वेग घेतला आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी अलीकडेच मुंबईतील खडसे यांच्या निवासस्थानी घेतलेल्या भेटीनंतर या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे.

महाराष्ट्रात भाजपच्या विस्तारात दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत एकनाथ खडसे यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. २०१४ पूर्वी विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी प्रभावी भूमिका बजावली होती. मात्र २०१४ मध्ये मुख्यमंत्रीपदाची अपेक्षा पूर्ण न झाल्यानंतर आणि भोसरी जमीन व्यवहार प्रकरणामुळे मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागल्यानंतर त्यांचे पक्षातील महत्त्व कमी होत गेले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी भाजपला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र तेथे त्यांचा राजकीय प्रवास अपेक्षेप्रमाणे यशस्वी ठरला नाही. दरम्यान, त्यांच्या सून तथा केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या वाढत्या राजकीय प्रभावामुळे खडसे यांच्या पुनरागमनासाठी दिल्ली स्तरावर सकारात्मक वातावरण असल्याची चर्चा सुरू आहे.

# सोनम वांगचुक यांना उपोषण मागे घेण्याचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला पाठिंबा देत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी उपोषणाला बसलेले पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावत असल्याबद्दल विविध स्तरांतून चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच त्यांनी आपले उपोषण मागे घ्यावे, असे




आवाहन करण्यात येत आहे.

या आंदोलनाला सिनेसृष्टीतूनही मोठा पाठिंबा मिळत असून ज्येष्ठ अभिनेत्री झीनत अमान यांनी केंद्र सरकारला वांगचुक यांच्याशी शांततापूर्ण चर्चा करण्याचे आवाहन केले आहे. भारताने आपल्या सर्वोत्तम विचारवंतांपैकी एकाचा असा बळी जाताना शांत बसून पाहू नये, असे त्यांनी समाजमाध्यमावर नमूद केले. तर '३ इडियट्स' चित्रपटातील अभिनेते ओमी वैद्य यांनीही वांगचुक यांच्या आरोग्याविषयी चिंता व्यक्त केली आहे. नासिरुद्दीन शहा व अरुंधती रॉय यांनीही वांगचुक यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त करत त्यांना उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले. आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनीही मंगळवारी या आंदोलनाला अधिकृत पाठिंबा जाहीर केला.

# भोजशाळेत नमाजासाठी जागा देण्याचा हंगामी आदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यातील वादग्रस्त भोजशाळा प्रकरणावर मंगळवारी सुप्रीम कोर्टाने एक महत्त्वपूर्ण अंतरिम आदेश दिला आहे. शुक्रवारच्या नमाजासाठी मुस्लिम बांधवांना भोजशाळा परिसराला लागूनच एक स्वतंत्र मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, असे



निर्देश सुप्रीम कोर्टाने मंगळवारी दिले आहेत. शुक्रवारी दुपारी १ ते ३ या वेळेत मुस्लिमांना या जागेवर नमाज पठण करता येईल. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या.जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हे स्पष्ट केले की, ही व्यवस्था पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपाची असून, या प्रकरणातील अंतिम निकालावर ती अवलंबून असेल.

सर्वोच्च न्यायालयाने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागालाही महत्त्वाचे आदेश दिले आहेत. कोर्टाच्या परवानगीशिवाय भोजशाळेच्या मूळ संरचनेत किंवा इमारतीत कोणत्याही प्रकारचे बदल केले जाऊ नयेत, असे न्यायालयाने बजावले आहे.


जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

क्र.प्रस्तु-१/कावी-३४४/२०२५-२६ दि.१०/०७/२०२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **नासीर शाह कासम शाह, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये स४११ विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे- नासीर शाह कासम शाह, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१४/०७/१९७४** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१०/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार वरुड**

जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

क्र.प्रस्तु-१/कावी-३३६/२०२५-२६ दि.०३/०७/२०२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **वकील अहेमद अब्दुल हबीब, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये स४११ विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे वकील अहेमद अब्दुल हबीब, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०१/०१/१९७३** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार वरुड**

# वैकुंठीचा राया तू






**पाटस** – येथील रोटी घाटातून दोन बैलांच्या सामर्थ्यास जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा पालखी रथ मार्गक्रमण करतांना.

## भक्ती शक्ती धर्मपीठ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – धर्माचे पाळन। करणे पाखांड खंडन । हे तुकोबारायांचे धर्म कार्य तर स्वराज्य धर्म रक्षण हे शिवबांचे धर्म कार्य. महाराष्ट्रातील या दोन परमोच्च विभूर्तींची भेट म्हणजे दोन अवतारी महापुरुषांचा अभूतपूर्व पवित्र संगम होता. महाराष्ट्राच्या इतिहासात भक्तीरूप तुकोबांच्या आणि शक्तीरुप शिवबांच्या भेटीला शब्दातीत असे अनन्यसाधारण महत्त्व आहे. तुकोबाराय कीर्तनाच्या माध्यमातून धर्म जागृतीसाठी जगउद्धाराचे कार्य करीत होते आणि या धर्मकार्याला उर्जितावस्था प्राप्त झाली असतानाच शिवरायांचे हिंदवी स्वराज्य स्थापनेचे कार्य चालू झाले होते. जगद्?गुरू तुकोबारायांची किर्ती ऐकून पुण्यात वास्तव्यास असलेल्या शिवरायांनी तुकोबारायांना दिवट्या, छत्री, घोडे आणि सोने, चांदी, हिरे यांचा नजराणा पाठवला. परंतु महाविरक्त तुकोबांनी त्याला स्पर्शही न करता शिवरायांना नजराणा परत पाठऊन, अभंगांचे पत्र पाठवले. 'दिवट्या छत्री घोडे। हे तो बऱ्यात न पडे।। तसेच 'तुमचे वेर वित्त धन।



ते मज मुत्तिकेसमान।। यामुळे वैराग्य, आत्मनिष्ठा आणि त्यागी वृत्तीचा शिवरायांवर मोठा परिणाम झाला.





## वारकरी सेवेची वर्ल्ड रेकॉड्‌र्स बुक ऑफ इंडियामध्ये नोंद

### दिवसभरात ३२६४ वारकऱ्यांच्या पायांची केली मालिश

### योग विद्या धामने केला विश्वविक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – मानवसेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरलेल्या एका ऐतिहासिक उपक्रमात योग विद्या धाम, पिंपरी चिंचवड, महाराष्ट्र यांनी प्रमोद निफाडकर यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली एका दिवसात सर्वाधिक वारकऱ्यांना पायांची मालिश सेवा या श्रेणीत नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे.

हा उपक्रम पुणे-पंढरपूर वारी मार्गावरील दिवे घाटाच्या माथ्यावर असलेल्या झेंडेवाडी येथे आयोजित करण्यात आला. सुमारे १५३ योग प्रशिक्षक व मसाज थेरपिस्ट यांनी सकाळी ९.१५ ते सायंकाळी ५.१५ या



कालावधीत ३२६४ वारकऱ्यांना निःस्वार्थ भावनेने पायांची मालिश सेवा प्रदान केली. हा टप्पा पूर्ण करून दिवे घाट चढल्यानंतर वारकऱ्यांना शारीरिक आराम मिळावा, या उदात्त हेतूने हा सेवा उपक्रम राबवण्यात आला. हा उपक्रम मानवता, निःस्वार्थ सेवा, सामाजिक उत्तरदायित्व, संघभावना आणि महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेप्रती असलेल्या आदराचे उत्कृष्ट उदाहरण आहे. वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाकडून योग विद्या धाम पिंपरी-चिंचवड येथील प्रमुख प्रमोद निफाडकर या उपक्रमाला अमूल्य सहकार्य करणारे निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सूर्यकांत निवृत्त सहाय दगडोबा केकाणे, सर्व स्वयंसेवक, सहकारी आणि या महान सेवा उपक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना प्रमाणपत्र व पदक देण्यात आले.

**सर्व पुराव्यांची पडताळणी**

या विश्वविक्रमासाठी आवश्यक असलेली लाभार्थी नोंद, स्वयंसेवकांची माहिती, छायाचित्रे, व्हिडीओ चित्रीकरण, स्वतंत्र साक्षीदारांचे अहवाल आणि इतर सर्व पुराव्यांची पडताळणी वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाच्या अधिकृत निकषांनुसार करण्यात आली.

## तुकाराम मुंढे यांचा धडाका : मुख्य सचिव आज एफडीएत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यापासून राज्यभरात आतापर्यंत ६८ धाडी टाकल्या. ५ कोटी ८७ लाखांचा माल जप्त करत १२ गुन्हे दाखल केले असून चारजणांना अटक केली आहे. पावसाळी अधिवेशनात सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनीही या कारवाईचे कौतुक केले.

आता राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनीही एफडीएच्या कारवाईची दखल घेतली असून, ते बुधवारी अन्न व औषध प्रशासन आयुक्तालयाला भेट देणार आहेत. अशी भेट देणारे अग्रवाल हे पहिलेच राज्याचे मुख्य सचिव आहेत. अन्न आणि औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेचा प्रश्न, कर्मचारी आणि आवश्यक प्रलंबित असलेल्या महत्वाच्या विषयावर मुख्य सचिव अग्रवाल तुकाराम मुंढे यांच्याशी चर्चा करणार आहेत. राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या २५ मेपासून १३ ऑगस्टपर्यंत कारवाईचा धडाका लावला असून गावखेड्यातल्या पानपट्टीपासून ते बड्या कंपन्यांपर्यंत एफडीएचे अधिकारी पोहोचले आहेत.

## आकाश दुबैय्या हत्या प्रकरण : माझा कोणताही संबंध नाही; सिद्ध झाल्यास गुन्हा दाखल करा – सागर बेग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – आकाश दुबैय्या हत्या प्रकरणानंतर श्रीरामपूरमधील राजकीय वातावरण अधिकच तापले असून आरोप-प्रत्यारोपांना नवे वळण मिळाले आहे. राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष तथा शिवसेना (शिंदे गट)चे नेते सागर बेग यांनी पत्रकार परिषद घेत आमदार हेमंत ओगले यांच्यावर जोरदार टीका केली. हत्या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचा ठाम दावा करत, संबंध सिद्ध झाल्यास स्वतःवर गुन्हा दाखल करण्याचे खुले आव्हान त्यांनी दिले.

तसेच विनाकारण बदनामी करणाऱ्यांविरोधात मानहानीचा दावा दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला. राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष तथा शिवसेना (शिंदेगट)चे नेते सागर बेग यांनी पत्रकार परिषद घेत आमदार हेमंत ओगले यांच्यावर थेट निशाणा साधला. हत्या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचा दावा करत, संबंध सिद्ध झाल्यास स्वतःवर गुन्हा दाखल करावा, असे आव्हान त्यांनी दिले.

बेग म्हणाले की, शनिवार (११ जुलै ) रोजी घटना घडत असताना हॉटेल व्यावसायिक शेखर दुबैय्या यांचा सर्वप्रथम आपल्याला फोन आला. हॉटेलमध्ये मुंबईहून आलेल्या काही व्यक्तींकडून मुलांना मारहाण होत असल्याची माहिती त्यांनी दिल्यानंतर आपण तातडीने पोलिस उपअधीक्षकांना संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.

---

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-२६८/२०२५-२६ दि.२६/०५/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **अनिस शब्बीर शेख, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी ग्रामपंचायत **बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये स४११ विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे-अनिस शब्बीर शेख, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०६/०३/१९७९** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२६/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५४६/२०२६** **ने.ता.०१/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) भाऊराव भुरेसिंग गजाम, वय अं.६२ वर्ष, धंदा-शेती, २) पंजाब भुरेसिंग गजाम, वय अं.५५ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व २ रा.महेंद्री, ता.वरुड, ३) सौ.शांता रतन परतेती, वय अं.७० वर्ष, धंदा-घरकाम, रा.टेंमणी, ता.जि.पांढुर्णा, ४) सौ.शिला विलासराव कुमरे वय अं.५३ वर्ष, धंदा- घरकाम, रा.मोर्शी, ता.मोर्शी, ५) सौ.कमला रंगीलाल तुमडाम, वय अं.४६ वर्ष, धंदा-घरकाम, रा.पंढरी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत भुरेसिंग फगना गजाम व मयत समोताबाई भुरसिंघ गजाम, रा.महेंद्री, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५८८/२०२६** **ने.ता.२४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सिमा संजय भोरे, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम, २) मृणाल संजय भोरे, वय अं.३० वर्ष, धंदा-शेती, ३) निखीले संजय भोरे, वय अं.२६ वर्ष, धंदा- शेती, सर्व रा.वंडली, ता.वरुड, ह.मु.वसई, ता.वसई, जि.पालघर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत संजय महादेवराव भोरे, रा.वंडली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४६१/२०२६** **ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-**

प्रशांत नारायण खरबडे

वय अं.३९ वर्ष, धंदा-शेती

रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत कमला किसनराव पोजगे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# महिला पर्यटक, कुटुंबीयांवर नाशिकमध्ये भीषण हल्ला : ९ जणांना अटक

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*





**नाशिक –** नाशिक जिल्ह्यातील भावली धरण परिसरात एका महिला पर्यटकाचा विनयभंग करून तिच्या कुटुंबावर गुंडांच्या टोळीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी मंगळवारी ९ जणांना अटक केली आहे. रविवारी धरण परिसरातील धबधब्यावर ही घटना घडली होती. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, ती तिचे पती, मुलगा, मुलगी, दीर आणि दोन पुतण्यांसह रविवारी भावली धरणाजवळील धबधबा पाहण्यासाठी गेली होती. तेथे दोन तरुणांनी महिलेला पाहून शिट्ट्या वाजवून तिची छेड काढण्यास सुरुवात केली. महिलेच्या कुटुंबीयांनी याला विरोध केला असता, हुल्लडबाजांनी त्यांना बेदम मारहाण केली.

# धरणांमध्ये ४४ टक्के पाणीसाठा : गेल्या वर्षीच्या तुलनेत १५ टक्क्यांनी कमी

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई –** महाराष्ट्रातील धरणांमध्ये सध्या त्यांच्या एकूण क्षमतेच्या केवळ ४४ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, हे प्रमाण गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहे, अशी माहिती राज्याच्या जलसंपदा विभागाने मंगळवारी दिली. मंगळवारी राज्य मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आलेल्या जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार, १३ जुलैपर्यंत राज्यातील ३,०२९ धरणांमध्ये एकूण ६३२.८९ टीएमसी (अब्ज घन फूट) पाणीसाठा उपलब्ध होता. गेल्या वर्षी याच तारखेला हा साठा ८४३.५७ टीएमसी (५९ टक्के) इतका होता.

# इलेक्ट्रीक तार, शेतातील तांब्याचे तार चोरणारी टोळी गजाआड

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाही : अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता



**वरुड –** इलेक्ट्रीक तार, शेतातील तांब्याचे तार चोरी करणारे दोन सराईत गुन्हेगारांना मुददेमालासह ताब्यात घेण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून त्यांनी आतापर्यंत मोर्शी, वरुड, आसेगांव पुर्णा, कळमेश्वर पोलिस स्टेशन अंतर्गत अनेक गुन्हे केले असल्याची कबूली दिली असून अनेक गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

पो.स्टे.वरुड येथे २७ ऑक्टोंबर २०२५ रोजी तक्रारदार समक्ष इलेक्ट्रीकचे संचालक नयन अरुणराव वानखडे (३५) यांनी तक्रार दिली की, त्यांचे समक्ष नावाचे इलेक्ट्रीक दुकान व गोडावुन हे मुलताई रोड एमएईबी ऑफीस समोर वरुड येथील असुन त्यांचे दुकानासमोर ठेवलेले ३ किमी वायर ७ बंडल व केबल १ बंडल असा एकुण ३ लाख रुपयाचा तसेच त्यांचे सहकारी मित्र ठेकेदार विनोद गोकुलदास बेलवंशी (३४) रा.शासकीय विश्रामगृह मागे वरुड यांचे बेलवंशी इलेक्ट्रीक नावाचे गोडावून समोरुन इलेक्ट्रीक बंडल २.५ किमी अंतराचे वायर अडीच बंडल असा २ लाख रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी चोरुन नेला. अशा तक्रारदार यांचे तक्रारी वरुन पो.स्टे.वरुड येथे कलम ३०३ (२) बी.एन.एस.चा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी सदर गुन्हा उघड करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा यांना सुचना निर्गमीत केल्या होत्या.

त्या अनुषंगाने सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा येथील पथकाला उपलब्ध तांत्रीक पुराव्या वरुन तसेच गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाली की, पोलीस स्टेशन वरुड येथील इलेक्ट्रीक तार चोरीतील मुख्य आरोपी महेंद्र पितांबर कपुर रा.शहापुर, ह.मु.गिटटीखदान नागपुर हा असुन तो नागपुर येथे आहे वरुन पथक वरीष्ठांचे आदेशाने तात्काळ नागपुर येथे रवाना झाले व नागपुर येथे सापळा रचुन महेंद्र कपुर यास त्याचे होन्डा सिटी वाहनासह ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने आधी उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्यानंतर त्यास विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हयाची कबुली देत सांगीतले की, तो त्यांचे होन्डा सिटी गाडी क्र.एमएच ३१ सीएस २८०९ ने आधी कुठे चोरी करायची? हे पाहुन येत होता व नंतर त्याचे टाटा एस वाहन क्र.एमएच ४० सीटी ११६४ मध्ये त्याचे गुन्हयातील इतर साथीदारांना घेवुन त्याने वरुड तसेच मोर्शी येथील वेरला शेत शिवार व सिभोरा शेतशिवारामध्ये इलेक्ट्रीक तार व ताब्याचे तार चोरुन नेवून नागपुर येथे विकले आहे. वरुन त्याचे कडुन होंडा सिटी गाडी क्र.एमएच ३१ सीएस २८०९ किंमत अंदाजे ३ लाख रुपये, टाटा एस वाहन क्र.एमएच ४० सीटी ११६४ अंदाजे ३ लाख रुपये, एक ओपो कंपनीचा निळसर रंगाचा ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमत अंदाजे १० हजार रुपये, एक शाओमी कंपनीचा निळसर रंगाचा ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमत अंदाजे १० हजार रुपये तसेच भंगार विक्रेता याचेकडुन अंदाजे इलेक्ट्रीक ॲल्युमिनीयम तार अंदाजे ३०० किलो किंमत अंदाजे २ लाख रुपयांचा तसेच पो.स्टे.मोर्शी येथील कलम ३०३ (२) बीएनएसमध्ये तांब्याचे ताराचे १४ बंडल अंदाजे ७०० फुट किंमत अंदाजे २५ हजार रुपये व कलम ३०३ (२) बीएनएसमध्ये तांब्याचे ताराचे ९ बंडल अंदाजे १५० फुट किंमत अंदाजे ९ हजार रुपये असा एकुण ८ लाख ५४ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे तसेच सदर आरोपीतांनी पो.स्टे.वरुड येथील अप क्रमांक ६२९/२०२५ कलम ३०३ (२) बीएनए, आसेगांव पुर्णा व कळमेश्वर जि.नागपुर येथील इलेक्ट्रीक तार चोरी केल्याची कबुली दिली आहे. पुढील तपास सुरु आहे. मिळुन आलेला जप्त मुददेमाल व आरोपीतांना पुढील कार्यवाही कामो पो.स्टे.वरुड यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक लांडे स्थानिक गुन्हे शाखेचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक नितीन इंगोले, पो.अमंलदार सुनील महात्मे, शिवाजी घुगे, दिनेश कनोजिया, चालक पो.हे.कॉ.नईम शाह, सर्व नेमणुक स्था.गु.शा.तसेच पो.स्टे. सायबर येथील पो.हे.कॉ.शिवा शिरसाठ, रितेश गोस्वामी यांनी केली.

# एसटीच्या २१३ जागांच्या विकासाला ‘हिरवा कंदील’: राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटीला स्वावलंबी बनवण्यासाठी एसटीच्या मालकीच्या अतिरिक्त जागांचा सार्वजनिक–खासगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) विकास करताना धोरणातील प्रक्रियांमधून सवलत देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे एसटीच्या राज्यभरातील २१३ ठिकाणच्या जागांचा विकासाचा मार्ग मोकळा झाला असून नियमित उत्पन्नाचा नवा स्त्रोत उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

राज्यभरात एसटी महामंडळाच्या ताब्यात सुमारे ८५० ठिकाणी ३,५०० एकर जागा आहे. यापैकी अनेक जागा शहरांच्या मध्यवर्ती आणि व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी आहेत. या जागांचा सार्वजनिक–खासगी भागीदारीतून विकास करून एसटीसाठी दीर्घकालीन उत्पन्न निर्माण करण्याचे नियोजन सरकारने केले आहे. या जागांवर आधुनिक बसस्थानके, व्यापारी संकुले, निवासी प्रकल्प तसेच अन्य व्यावसायिक वापराच्या सुविधा उभारण्यास परवानगी देण्यात आली आहे. व्यापारी संकुलांसोबत निवासी आणि अन्य वापरास मान्यता मिळाल्यास जागांचा अधिक प्रभावी वापर होऊन महामंडळाच्या उत्पन्नात मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे.

**पीपीपी धोरणातून सवलत**

५ मार्च २०२६ रोजी राज्य सरकारने जाहीर केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक–खासगी भागीदारी धोरणानुसार (पीप–ीपी) प्रक्रिया राबविल्यास एसटीच्या विकास प्रकल्पांना विलंब होण्याची शक्यता होती. त्यामुळे या धोरणातील काही प्रक्रियांमधून एसटीला सवलत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. त्यानुसार महामंडळाने राज्यातील २१३ ठिकाणांच्या विकासाचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. या प्रकल्पांना मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समिती आणि शक्ति प्रदत्त समितीच्या मंजुरीच्या प्रक्रियेतून सवलत देण्यात आली असली तरी प्रत्येक प्रकल्पाला राज्य सरकारची अंतिम मंजुरी घेणे बंधनकारक राहणार आहे.

**९८ वर्षांसाठी भाडेतत्वावर**

राज्य सरकारने १ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये महामंडळाच्या जागा व्यापारी तत्त्वावर विकसित करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार आणि ८ एप्रिल २०२६ च्या शासन निर्णयान्वये उत्पन्नवाढीसाठीची जागा विविध व्यावसायिक प्रयोजनासाठी ४९ अधिक ४९ वर्षांच्या भाडेतत्वावर विकसित करण्यास मान्यता दिली आहे. महा मंडळाच्या जागा सार्वजनिक खासगी – भागीदारी तत्वावर विकसित करताना निवासी, अनिवासी, व्यापारी, औद्योगिक इत्यादी सर्व बाबींसाठी वापरण्यास मान्यता देण्यात आली आहे.







